# तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, कुडाळ

ग्रामीण रुग्णालय कुडाळ यांची इमारत मागे , मालवण रोड, कुडाळ ४१६५२०

Email kudalnrhm11@gmail.com,


जाक्र.ताआअकु/एनएचएम/ UHWC /दरपत्रक/२१६/२०२6 दि.११ /09/2026

## दरपत्रक मागणी नोटीस

सन २०२६ - २०२७ या आर्थिक वर्षासाठी तालुका आरोग्य कार्यालय, कुडाळ अंतर्गत कुडाळ शहरात शहरी आरोग्यवर्धीनी केंद्र कुडाळ 1 येथे १५ व्या वित्त आयोग अंतर्गत अधिपरिचारीका (Staff Nurse) व शहरी आरोग्यवर्धीनी केंद्र कुडाळ 2 येथे १५ व्या वित्त आयोग अंतर्गत आरोग्य सेवक (पु) (MPW (Male)) कर्मचारी उपलब्ध करून देणे करिता बाहयसंस्था निश्चित करणेकरिता इच्छुक दरपत्रक धारकांकडून खालील तपशिलात नमूद केलेप्रमाणे बंद लखोटयात दरपत्रके मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | तपशील | शैक्षणिक अर्हता (Educational Qualification) | मासीक मानधन (Per Month Salary) | मक्तेदाराने सर्व करासहीत भरावयाचा दर |
|---|---|---|---|---|
| ३ | अधिपरिचारीका (Staff Nurse) | GNM / BSc Nursing Course | २०,०००/- | |
| ४ | आरोग्य सेवक (पु) (MPW Male) | 12th Pass In Science + Paramedical Basic Training Course OR Sanitary Inspector Course | १८,०००/- | |

तरी इच्छुक दरपत्रक धारकांनी सदरची दरपत्रक नोटीस प्रसिध्द झालेपासून १० दिवसांपर्यत म्हणजेच दिनांक २१/०९/२०२६ रोजी दुपारी ०३.०० वाजेपर्यत विहित नमून्यांत परिपूर्ण दरपत्रक बंद लखोटयातून या कार्यालयास समक्ष आणून अथवा डाक सेवाव्दारे सादर करावयाची आहेत. मुदतीत प्राप्त दरपत्रकांची छाननी करुन अटी व शर्तीपूर्ण झालेली दरपत्रके खोलून तुलनात्मक तक्त्याच्या आधारे किफायतशीर दरपत्रक धारकला पुढील आदेश देणेत येईल.

### दरपत्रकाच्या अटी व शर्ती

१) दरपत्रक सादर करतेवळी दरपत्रकासोबत खालील दस्तऐवज छायांकीत प्रती सादर करणे आवश्यक आहे:

१) संस्था नोंदणी प्रमाणपत्र / जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र

२) संस्थेचे पॅनकार्ड झेरॉक्स

३) ESIC प्रमाणपत्र

४) P-Tax नोंदणी प्रमाणपत्र

५) EPF नोंदणी प्रमाणपत्र

६) 3 Month EPF भरणा केलेबाबतचे दस्तऐवज

२) दरपत्रक धारकाने मासीक मानधनाच्या किमान ३.८५% ते कमाल ७% सेवा शुल्क आकारुन तसेच EPF, ESIC व P Tax या वजावटी करुन उर्वरित मानधन रक्कम कर्मचारी यांचे बँक खात्यावर जमा करणे बंधनकारक आहे.

३) ज्या दरपत्रकधारकांचे दरपत्रक मंजूर होईल त्यांनी आदेश दिलेपासून दरपत्रकात नमूद दरानुसार अधिपरिचारीका (Staff Nurse) & आरोग्य सेवक (पु) (MPW (Male)) यांची तात्काळ नियुक्ती त्यांचे नियुक्ती आदेश या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील. तसेच कार्यालयाकडुन रिक्त पदांणचा तपशिल आवश्यकतेप्रमाणे देणेत येईल त्यानुसार नियुक्ती आदेश देणे बंधनकारक राहील.

४) ज्या दरपत्रकधारकांचे दरपत्रक मंजूर होईल त्यांनी दरमहाचे देयक पुढील महिन्याच्या १ तारीखला दरपत्रकात नमूद दरानुसार तसेच संबधीत कर्मचारी हजेरी अहवालासोबत या कार्यालयाला सादर करणे आवश्यक आहे. संबधीत कर्मचारी

Scanned with OKEN Scanner

याचकडून केलेल्या कामाच मुल्यामापन करुन प्रत्यक्ष केलेल्या कामाकाजानुसार मक्तेदार संस्थेच्या दयकामधून शासन प्रचलित दरानुसार टी.डी.एस वजावट करुन देयकाची रक्कम संबधीत मक्तेदाराच्या बँक रक्कम जमा करणेत येईल.

५) तसेच संबंधीत कर्मचारी याना दरमहा ESIC/EPF/P-Tax इत्यादी संबंधी वजावट विहीत वेळेत करुन तसेच कर्मचारी यांना वेतन प्रमाणपत्र देण्याची जबाबदारी ही संबधीत मक्तेदार (मंजूर दरपत्रकधारक) यांची राहील. त्यास हे कार्यालय जबाबदार असणार नाही.

६) विहित मुदतीत आदेश दिलेपासून कर्मचारी पुरवठा न केल्यास शासन नियमानुसार देय रक्कमेवर दंड देयकामधून वसूल केला जाईल. तसेच मक्तेदार संस्थेचे कामकाज समाधानकारक नसलेस अथवा शासनस्तरावरुन सदर आदेश रदद करणेसंदर्भात आदेश प्राप्त झालेस कोणत्याही क्षणी आगाऊ पूर्वकल्पना न देता सदरचे आदेश रदद करण्याचे अधिकार खाली सही करणार यांना राहतील.

७) मुदतीत प्राप्त न होणारी एक अगर सर्व दरपत्रके नाकारण्याचा अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवला आहे.

८) ज्या दरपत्रकधारकांचे दरपत्रक मंजूर होणार त्या मक्तेदाराला रक्कम रु.५००/- च्या बॉण्ड पेपरवर सोबत जोडलेले करारपत्र देणे बंधनकारक राहील. सदरचे करारपत्र दिल्यावर कामचा आदेश दिला जाईल.

९) नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र, कुडाळ1 व २ कार्यालयीन वेळ सकाळी ९.०० ते सायंकाळी ५.०० अशी आहे.

**दरपत्रक मागणी नोटीस लावण्याचे ठिकाण**

०१) तालुका आरोग्य अधिकारी, कुडाळ नोटीसबोर्ड

०२) www.nrhm.maharashtra.gov.in

०३) www.arogya.maharashtra.gov.in

Taluka Health Officer
Taluka Kudal

तालुका आरोग्य अधिकारी (गट-अ)
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

वरील संकेतस्थळावर दरपत्रक नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासून १० दिवसाया मुदतीत दरपत्रक स्वीकारली जातील याची नोंद घ्यावी.

Scanned with OKEN Scanner